व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे २ वर्ष कालावधीचे
पुर्णवेळ स्वरूपाचे अभ्यासक्रमांना "प्रमाणपत्र
अभ्यासक्रम" ऐवजी "पदविका अभ्यासक्रम" अशा
नावाने प्रमाणपत्र प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी-२०१२/६९७/प्र.क्र.२९२/व्याशि-४,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २०१३.

संदर्भ : संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र. ५/व्हीओसी/२२०३/२०१२/५८, दिनांक १८/१०/२०१२.

**प्रस्तावना :** कोणतीही उत्पादकता ही कौशल्य स्तर व शैक्षणिक पात्रता यावर अवलंबून असते. परंतु भारतीय मनुष्यबळांत बहुतांशी बाजारपेठ कौशल्य आत्मसात केल्याचे दिसत नाही. त्यामुळे कौशल्य वृध्दीसाठी व रोजगारासाठी मुबलक प्रमाणात संधी उपलब्ध आहे, ही बाब लक्षांत घेऊन केंद्रशासनाने कौशल्य विकास योजना (Skill Development Initiative) अंमलात आणली आहे. हा विषय स्वत: मा.पंतप्रधान यांच्या विषयसूचीवर असून, या योजनेच्या माध्यमातून पंतप्रधानांनी सन २०२२ पर्यंत ५० कोटी उमेदवारांना विविध व्यवसायिक शिक्षण देऊन, जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ निर्मितीचे लक्ष ठेवले आहे.

सदर योजना भारतास जागतिक महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असून या योजनेवर सर्व क्षेत्रातून भरीव कामगीरी होणे आवश्यक आहे. ही योजना यशस्वी होणेसाठी उमेदवारांना व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण केलेनंतर **प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course)** ऐवजी **पदविका अभ्यासक्रम (Diploma Course)** अशा नावाने प्रमाणपत्र प्रदान केल्यास अशा प्रकारे प्राप्त झालेल्या पदविका प्रमाणपत्रामुळे राज्यातील उमेदवारांचा फायदा होईल, तसेच आस्थापनांचे मानसिकतेमध्ये बदल होऊन जास्तीत जास्त विद्यार्थी व्यवसाय शिक्षणासांठी प्रवेश घेतील, **परीणामी कौशल्य विकास योजनेचे लक्ष साध्य करता येईल.**

विविध राज्यांमध्ये / मंडळामार्फत / संस्थांमार्फत १ वर्ष /२ वर्ष कालावधीच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना पदविका (Diploma) असे प्रमाणपत्र प्रदान करणेत येत आहे. मंडळाचे २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रमांमध्ये संबंधीत व्यावसायिक अभ्यासक्रमासंबंधी विषयाचा जवळजवळ ६७% भाग असून त्याव्यतिरिक्त इतर अनुषंगिक विषय आहेत. अशा २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांची परीक्षा ९०० गुणांची घेणेत येत असते. अशा प्रकारच्या प्रशिक्षण / परीक्षा पध्दतीमुळे निश्चितपणे प्रवेशित विद्यार्थ्यांचा संबंधीत व्यवसायाचे परीपूर्ण कौशल्याबरोबरच इतर विषयामुळे सर्वांगीण विकास होऊ शकतो. त्यास अनुसरून व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा २ वर्ष कालावधीच्या पुर्णवेळ स्वरुपाच्या अभ्यासक्रमांना सुध्दा पदविका **(Diploma)** प्रमाणपत्र प्रदान करणेस मान्यता देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासन निर्णय :-***

वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा २ वर्ष कालावधीच्या पुर्णवेळ स्वरुपाच्या अभ्यासक्रमांना **प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Course)** ऐवजी **पदविका अभ्यासक्रम (Diploma Course)** अशा नावाने प्रमाणपत्र प्रदान करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरची मान्यता ही

यापुर्वी शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०१२/५११/ प्र.क्र.२४५(आ)/व्यशि-४, दिनांक २८ सप्टेंबर २०१२ यासाठी लागू राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्रमांक २०१३०१२११५४५२६३५०८ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( सी. के. जाधव )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, रोजगार स्वयंरोजगार व कौशल्य विकास, नवी मुंबई.
२) संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई - १
३) संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मंबई - १
४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नाशिक /पुणे/अमरावती /औरंगाबाद/ नागपूर (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)
५) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)
६) सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
७) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव
८) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव
९) निवड नस्ती (व्यशि-४)